# भारता ची कम्युनिस्ट पार्टी(माओवादी)
# COMMUNIST PARTY OF INDIA (MAOIST)
## केन्द्रीय कमेटी

30 जानेवारी 2021 प्रेस विज्ञप्ती

## मोदी सरकार च्या जन विरोधी तीन कृषि कायद्याला पूर्णपणे रद्द करण्याकरिता संघर्ष चालू ठेवा!

दिल्ली आणि देशभऱ्यांत एकता आणि दृढ़संकल्पा सोबतच, मोदी सरकारच्या शेतकरी विरोधी तीन कायद्याला रद्द करण्याकरिता सतत संघर्षरत असणाऱ्या शेतकऱ्यांना, भारताची कम्युनिस्ट पार्टी (माओवादी) पुन्हा एकदा क्रांतिकारी अभिवादन करित लाल सलाम करित आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या 26 जानेवारी च्या ''ट्रैक्टर परेड रैली'' चे क्रांतिकारी जोशात स्वागत करित आहो.

दिल्ली आणि देशभऱ्यांत चालू असलेल्या या शेतकऱ्यांच्या आंदोलना ने ब्रिटीश काळातील रौलट ॲक्ट च्या विरोधाची आठवण ताजी केली. तेंव्हा ब्रिटीश होते आज साम्राज्यवादी दलाल मोदी आहे. तेंव्हा भगतसिंह होते आज संग्रामी शेतकऱ्यांच्या रूपात त्यांचे लाखों वारिस आहेत. सरकार कायदे वापस घेण्याऐवजी वेळ काढू भूमिका घेत आंदोलनाची हवा काढून टाकण्याचे धोरण राबवित आहे. चर्चेच्या 11 फेऱ्या झाल्या. प्रत्येक फेऱ्यांमध्ये शेतकरी नेत्यांनी स्पष्टपणे कायदे रद्द करण्याबाबतची मागणी रेटून धरली. तरी सुध्दा सरकार ने अकडूपणाची भूमिका घेतली आहे. कारण हे सरकार साम्राज्यवादी आणि भारतीय दलाल कंपन्यांचे सरकार आहे.

लाखों शेतकऱ्यांनी ट्रैक्टर्स सोबत 26 जानेवारी ला दिल्ली कूच करित जगाला हे दाखवून दिले कि, हे गणतंत्र कसे पक्षपाति आणि शेतकरी विरोधी आहे. रैली ला परवानगी देउनही शाशनाने पोलीसांकरवी शेतकऱ्यांना थांबविण्याचे प्रयत्न केले. शेतकऱ्यांच्या मार्गात हेतूपुर्णरित्या बैरिकेट्स लावले. अश्रू गैस सोड़ली. लाठिचार्ज केला. एक नवरीत सिंह नावाच्या युवकाचा मृत्यू झाला. कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी शाशनाची असते. शेतकऱ्यांच्या शांतिपूर्ण आंदोलनाला हिंसक बनविण्याकरिता सरकारने बरेच प्रयत्न केले. आंदोलना मध्ये घुसून फुट व गड़बड निर्माण करण्याचे मोदी सरकार चे सुरुवाती पासूनच प्रयत्न राहीले आहे. 26 जानेवारीला झालेल्या हिंसक घटनांमागे स्पष्टपणे सरकारचाच हाथ राहीला आहे. दीप सिधू आणि लख्खा सिधना या भाजपाच्या एजेंटांना आंदोलनाला भटकविण्या करिता घुसविल्या गेले. विशेष सुरक्षा असतांनाही या एजेंटांना लाल किल्यांकडे जावू दिले. लाल किल्यावर झंडा फडकविणे, ट्रैक्टर रैलीला हिंसक रंग देणे, आणि नंतर शेतकरी नेत्यांवर खोट्या केसेस दाखिल करणे हा ब्राम्हणी हिन्दूत्व फासीवादी मोदी सरकारच्या षड़यंत्रकारी प्लान चा हिस्सा आहे. सरकारच्या या घृणास्पद आणि क्रूर हरकतीची आम्ही घोर निंदा करित आहो. आम्ही पोलीस आणि सेनेच्या जवानांना अपील करित आहो कि, त्यांनी सयंम राखावा आणि शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ उभे राहावे कारण ते सुध्दा शेतकऱ्यांचे मुले, मुली आहेत. लाल किल्यावरुन प्रधान सेवक असल्याचा दंभ भरणाऱ्या खोटारड्या पोकळ घोषणाबाज प्रधानमंत्रीचा या रैलीने पर्दाफाश केला. नरेन्द्र मोदी हे देशातील जनतेचे प्रधान सेवक नाही तर साम्राज्यवादी आणि दलाल कार्पोरेट घराण्यांचे प्रधान सेवक आहेत हे सत्य आता उघडपणे समोर आले आहे. कायदे रद्द केल्याशिवाय अन्य काहीच मान्य नाही असा एकताबध्द दृढ़संकल्प आपण दाखवून, करार करणाऱ्या खेळी धुळीस मिळविल्या. शेतकऱ्यांच्या संयुक्त मंचा बाहेर देखिल अजुनही काही शक्ति आहेत. त्यांना आम्ही अपील करित आहो कि त्यांनी वेळेचे महत्व समजावे व ही कायदे रद्द करण्याची लढाई मिळून लढावी. खाद्यान्न साठा मोदी सरकार अदानी आणि अंबानीं च्या हवाली करून गरीब जनतेच्या तोंडचा घास पळवित आहे. खाजगी बाजार उघडून आणि जमीन कार्पोरेटच्या हातात देवून शेतकऱ्यांच्या मानेवर कार्पोरेटची तलवार लटकविली आहे. हे कायदे म्हणजे लहान धंदे आणि लहान व्यापाऱ्यांच्या उपजिविकेचे साधने हिसकविण्याचा पूकाराच आहे. या कायद्यांमुळे केवळ शेतकरीच नाही तर आम जनतेच्या 80 टक्के लोकांवर विपरित परिणाम पडणार आहे. त्यामुळे आम्ही सर्व जनतेला या शेतकरी संघर्षात सामील होण्याची अपील करित आहो. या समर्थनार्थ देशभऱ्यांत आपआपल्या क्षेत्रात सतत संघर्ष करावा. तसेच मोदी सरकारला हे कायदे वापस घेण्याकरित भाग पाडावे. शेतकरी संयुक्त मोर्चा व्दारा आयोजित 1 फेब्रूवारी 2021 च्या संसद घेरावाला व संघर्षाच्या अन्य कार्यक्रमांच्या समर्थनार्थ देशभऱ्यांत निदर्शने आणि प्रदर्शने करण्याची सर्व जनतेला आम्ही अपील करित आहो. माओवादी पार्टीचे सर्व कॅडर, पीएलजीए, क्रांतिकारी जनसंगठन, सर्व जनसंगठन आणि जनताना सरकार यांस आवाहृन आहे कि त्यांनी देशात चालू असलेल्या शेतकरी आंदोलनाच्या समर्थनार्थ आणि तीन कृषि संबधित कायद्यांना रद्द करण्याकरिता सतत संघर्ष चालू ठेवावा. याच संघर्षाच्या साखळीच्या रूपाने 10 फेब्रूवारी 2021 ला (महान भूमकाल संघर्ष दिवस) देशभऱ्यांत प्रदर्शन करावे.

अभय

अभय

प्रवक्ता, भाकपा (माओवादी)